देशोन्नती

# ज्येष्ठ नागरिकांसाठी मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना

## ३१ ऑगस्टपर्यंत अर्ज मुदत

देशोन्नती वृत्तसंकलन

**पारशिवणी** : महाराष्ट्र शासनाने ज्येष्ठ नागरिकांसाठी 'मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजने'च्या माध्यमातून देशातील प्रमुख तीर्थक्षेत्र दर्शन संधी उपलब्ध केली आहे. सर्व धर्मातील ६० वर्षावरील ज्येष्ठांना योजनेचा लाभ घेता येणारआहे. प्रवास खर्चासाठी प्रती दर्शनात्री ३० हजार रुपये अनुदान दिले जाईल. अर्जाची मुदत ३१ ऑगस्टपर्यंत असून, महाराष्ट्रातील ६३ व अन्य राज्यातील७३ तीर्थस्थळे निश्चित केली आहेत.

### अशी होणार लाभार्थी निवड

लाभार्थ्यांची निवड जिल्हास्तरीय समिती करेल. अर्जदारांच्या संख्येसह त्या जिल्ह्याच्या लोकसंख्येच्या प्रमाणात कोटा निश्चित केला जाईल. विहित कोट्यापेक्षा जास्त अर्ज आल्यास संगणीकृत लॉटरीद्वारे लाभार्थी निवड केली जाईल. प्रवासासाठी आवश्यक सुविधांचा निर्णय शासन घेईल. प्रवासासाठी नियोजित स्थळी स्वखर्चाने पोहोचावे लागेल.

### आवश्यक कागदपत्रे

आधार कार्ड, रेशनकार्ड, महाराष्ट्राचे अधिवास प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास १५ वर्षापूर्वीचे रेशन कार्ड, मतदार ओळखपत्र/शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र, जन्म दाखला या चारपैकी कोणतेही ओळखपत्र, प्रमाणपत्र ग्राह्य राहील. सक्षम प्राधिकाऱ्याचा कुटुंब प्रमुखांचा उत्पन्नाचा दाखला (वार्षिक उत्पन्न २.५० लाखांपर्यंत अनिवार्य) किंवा पिवळे, केशरी रेशनकार्ड, वैद्यकीय प्रमाणपत्र, पासपोर्ट फोटो, जवळच्या नातेवाईकाचा मोबाईल क्रमांक, अटी शर्तींचे पालन हमीपत्र आवश्यक राहील. सरकारी वैद्यकीय अधिकाऱ्याने प्रवासासाठी सक्षम प्रमाणपत्र लागेल. अर्ज भरण्याची प्रक्रिया विनामूल्य असेल. पात्र अर्जदारांची तात्पुरती यादी पोर्टल, ॲपवर जाहीर केली जाईल. अर्जासंबंधी अधिक माहितीसाठी समाज कल्याण विभागात संपर्क साधावा. अर्ज योजनेसाठीचा पोर्टल, मोबाईल ॲप किंवा सेतू सुविधा केंद्राद्वारे ऑनलाईन करता येईल.

Nagpur Edition
Aug 10, 2024 Page No. 6
Powered by: erelego.com